**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : टिपीबी-४३१९/७७२/प्र.क्र.८/२०२०/नवि-११
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : १३/०२/२०२०.

प्रति,
**आयुक्त,**
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- Clarification under Clasue 4(3) of DCPR 2034 regarding applicability of Inclusive Housing as per Reg.15 of DCPR 2034 for the on-going proposals where Residential development has partly taken place as per DCR 1991.

संदर्भ :- आपणाकडील पत्र क्र. MGR/4585, दि. १३/०१/२०२०.

महोदय,

आपणाकडील संदर्भित पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

मे. क्रेडाई-एमसिएचआय यांचे दि. ३१/१०/२०१९ रोजीचे विनंती अर्जाचे अनुषंगाने बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम १५ मधील Inclusive Housing च्या तरतूदी संबंधी विनियम ४(३) अन्वये संदर्भित पत्राद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेने शासनाकडून स्पष्टीकरण अपेक्षिले आहे.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या विचारणेवर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ४(३) नुसार खालील स्पष्टीकरण कळविणेबाबत मला आदेश आहेत.

i) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील तरतुदीनुसार औद्योगिक ऐवजी रहिवास /वाणिज्य ( I to R/C) असा जमिन वापर बदल मंजूरी दिलेल्या प्रगतीपथावरील योजनामधील विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ९(६)(b) नुसार उर्वरित क्षेत्रासाठी (Balance Potential) प्रकल्प प्रवर्तकाने प्रस्ताव सादर केल्यास अशा विकासास बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या Inclusive Housing च्या विनियम १५ च्या तरतूदी लागू होणार नाहीत. तसेच विकास नियंत्रण नियमावली-१९९१ मधील तरतुदीनुसार औद्योगिक ऐवजी रहिवास/ वाणिज्य (I to R /C) असा वापर बदल मंजूर करताना नियमानुसार सुविधा क्षेत्र सोडलेले/ समायोजित केले असल्यास त्यानंतर पुन्हा त्यामधील स्वतंत्र भूखंडामध्ये सुविधा क्षेत्र सोडण्याची आवश्यकता राहणार नाही.

ii ) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मध्ये फेरबदल करुन अधिसूचना दि. ०८/११/२०१३ द्वारा Inclusive Housing ची तरतूद अंतर्भूत करण्यात आली. सदर दि.८/११/२०१३ रोजीची शासन अधिसूचना निर्गमित होणेपूर्वी अभिन्यासात बांधकाम प्रारंभ परवानगी (CC) देण्यात आलेल्या प्रकरणी उर्वरित क्षेत्राचा (Balance Potential ) विकास

Scanned by CamScanner

करताना देखील बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील Inclusive Housing च्या विनियम १५ च्या तरतूदी लागू होणार नाहीत.

आपला,

(निर्मलकुमार पं. चौधरी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव :-**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) प्रमुख अभियंता ( वि.नि.), बृहन्मुंबई महानगरपालिका.
३) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
४) निवडनस्ती (नवि-१)

Scanned by CamScanner